## संदर्भ

अक्षर सुंदर दिसतंय खरं,
पण लिहिताना हात भरून येतो.
शब्द शब्द उतरवताना,
भावनांचा मनी कल्लोळ होतो.
मनातलं उतरवायच
कागदावर थेट,
म्हणजे तो, त्याचे संदर्भ..
त्याची-माझी भेट!
सगळंच येतं ओघानं,
झरत जातं जोमानं
लिहीत राहते नेटानं
त्याच्या वरच्या प्रेमानं..
मग
आठवणी येतात दाटून
आणि
संभाळलेलं बाहेर पडतं
मन-काळीज फाटून..
शब्द शब्द गुंफताना
जाणवतं, सगळंच तुटलंय
प्रेम प्रेम म्हणताना
सगळं आयुष्यच लुटलंय!
हाती केवळ उरलेत आता
मोडके तोडके शब्द काही
माझा अट्टाहास, माझंच प्रेम
त्याचं असं काहीच नाही..
अक्षर सुंदर दिसतंय खरं
तेवढंच काय ते उरलंय
काळ्या मेघाची रुपेरी कडा..
त्यावर आभाळ सारं तरलंय !

**©प्रीती देशपांडे**